लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे,
# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली
आर्टस — कॉमर्स
''बी'' पुनर्मुल्यांकित महाविद्यालय
राजनेमी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली —४१६४१६
फोन — (०२३३) २३७५०७५ फॅक्स — (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)
Website-www.ndpncsanglicollege.com E-mail.Id-ndpncsangli@rediffmail. Com

जा.क्र.एनडीपीएनसी./ दिनांक:— / /

## दाखला

दाखला देण्यात येतो की, या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सन २०१४ — २०१५ या शैक्षणिक वर्षात नियमित कार्यक्रमांतर्गत महाविद्यालय परीसरात खालील उपक्रम राबवले आहेत.

१) दि.०७/०७/२०१४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना — उद्घाटन
२) दि.०८/०७/२०१४ विद्यार्थी प्रबोधन
३) दि.११/०७/२०१४ जागतिक लोकसंख्या दिन व्याख्यान — प्रा.एस.के.रावळ
४) दि.११/०८/२०१४ रक्षा बंधन दिन साजरा
५) दि.१२/०८/२०१४ साक्षरता/पर्यावरण/एड्स जनजागृती/लेख वाचवा इ. पोस्टर प्रेझेंटेशन
६) दि.१३/०८/२०१४ रक्तदान शिबीर
७) दि.१४/०८/२०१४ महाविद्यालय परीसर स्वच्छता मोहिम
८) दि.१९//०८/२०१४ ते २१/०८/२०१४ विद्यार्थी प्रबोधन
९) दि. ०४/०९/२०१४ व ०८/०९/२०१४ रोजी गणेश विसर्जन निर्माल्या गोळा करणे
१०) दि.१६/०९/२०१४ 'महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण विकासाच्या विविध योजना या विषयावर व्याख्यान' श्री. पडवळे
११) दि. ०२/१०/२०१४ महात्मा गांधी दिनानिमित्त श्रमदान व महाविद्यालय परिसर स्वच्छता दिन
१२) दि. १६/१०/२०१४ जागतिक अन्न दिन व्याख्यान प्रा.एस.के.रावळ
१३) दि. १३/११/२०१४ वाहतुक सुरक्षा व्याख्यान प्रा.के.आर.गावडे
१४) दि. १५/११/२०१४ जागतिक बचत दिन व्याख्यान प्रा.डॉ.बी.एस.पाटील
१५) दि. २०/११/२०१४ प्रर्यावरण संगोपन, वक्तृत्व व विद्यार्थी चर्चासत्र
१६) दि. १०/१२/२०१४ मानवी हक्क दिन व्याख्यान प्रा. महावीर.एस.पाटील
१७) दि. १८/१२/२०१४ राष्ट्रीय एकता Power point Presentation अल्पसंख्याक हक्क व गट चर्चा
१८) दि. १८/१२/२०१४ मेणबत्ती मोर्चा पेशावर येथे झालेल्या हत्या कांडाचा निषेध
१९) दि. ०३/०१/२०१५ स्त्री सबलीकरण व्याख्यान — डॉ. सौ. एस.बी.वालवडकर
२०) दि. १४/०१/२०१५ विशेष श्रमसंस्कारा शिबीरा निमित्त विद्यार्थी प्रबोधन
२१) दि. १४/०१/२०१५ आधूनिक संवाद साधने फायदे तोटे गट चर्चा
२२) दि. १७/०१/२०१५ कणेरी मठ कोल्हापूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर
२३) दि. १२/०२/२०१५ दादूकाका भिडे वसतीगृहामध्ये स्वच्छता मोहिम

लट्ठे एज्युकेशन सोसायटीचे,

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स, सांगली

आर्टस — कॉमर्स

''बी'' पुनर्मुल्यांकित महाविद्यालय

राजनेमी परिसर, उत्तर शिवाजीनगर, सांगली —४१६४१६

फोन — (०२३३) २३७५०७५ फॅक्स — (०२३३) २३७५०७३ पोस्ट बॉक्स नं.३८ (महाराष्ट्र)

Website-www.ndpncsanglicollege.com E-mail.Id-ndpncsangli@rediffmail. Com

जा.क्र.एनडीपीएनसी./ दिनांकः— / /

२४) दि. २३/०२/२०१५ राज्य घटनेतील मुलभूत कर्तव्य महत्व व्याख्यान प्रा.डॉ.राजू सांवत

२५) दि. २४/०२/२०१५ कांतीकारकांचे स्वातंत्र्य लठयातील योगदान प्रा. गौतम ढाले

२६) दि.०८/०३/२०१५ जागतीक महिला दिन व्याख्यान

(डॉ.ए.ए.पांडे)
प्र.प्राचार्य

Shivprasad Shete
(NSS Programofficer)



पत्रकमाकं घोरपडे सर २०१२–१३ A4

ल.ए.सोसायटीचे

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, सांगली

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम अहवाल २०१४–१५

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून आमच्या महाविद्यालयास १०० स्वयंसेवकांचे एक युनिट मंजूर करणेत आले आहे.

**राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक नोंदणी :–** शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे यासाठी महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर नोटीस लावणेत आली होती. तसेच ही नोटीस सिनियर महाविद्यालयाच्या वर्गात फिरवली होती. या नोटीस मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची थोडक्यात माहिती दिली होती. त्या अनुषंगाने रितसर प्रवेश अर्ज भरून घेऊन प्रथम आणि व्दितीय वर्षासाठी १०० विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये विद्यापीठाच्या नियमानुसार अनुसूचित जाती व अनुसूचीत जमातीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून येण्यात आले आहे.

**उदघाटन :–** राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाविद्यालयातील विविध मंडळे असा संयुक्त उद्घाटन संमारभ ल.ए.सोसायटी, सचिव मा. सुहास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा सर्वगुण संपन्न सक्षम नागरीक बनतो तसेच सामाजिक बाधिलकितून तो सामजसेवक बनतो असे प्रतीपादन यावेळी त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमर पांडे विविध मंडळाचे निमंत्रक प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

**प्रबोधन शिबीर :–** राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांचे तीन दिवस प्रबोधन शिबीर घेण्यात आले. या शिबीरामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत नियमित कार्यक्रमातंर्गत आणि विशेष शिबीराव्दारे कोणकोणते उपक्रम राबवले जातात या विषयी स्वंयसेवकांना सविस्तर माहिती देणेत आली. त्याच प्रमाणे या विभागाची सुरवात कशी झाली. एन.एस.एसमध्ये सहभागी झाल्यानंतर कोणकोणते फायदे होतात. या विषयी माहिती देणेत आली. राष्ट्रीय सेवा योजनेत यशस्वीपणे २४० तास पूर्ण करणा–या आणि विशेष शिबीरामध्ये सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून अंतीम परीक्षेत १० गुंण अधीक दिले जाणार असल्याची माहितीही विद्यार्थ्यांना देणेत आली. याच बरोबर वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत कोणकोणते उपक्रम राबवले जाणार आहेत. याचे नियोजन विद्यार्थ्यांना सांगितले.

**श्रमदान, साफसफाई, स्वच्छता :–** महाविद्यालयाने एन.एस.एस.चे विविध उपक्रम राबवण्यासाठी हरीपूर ता.मिरज जि.सांगली. हे गाव दत्तक खेडे म्हणून निवडले आहे. दत्तक खेडे हरीपूर या बरोबरच महाविद्यालय परीसर, दादूकाका भिडे निरीक्षण गृह, स्वच्छता व साफसफाई झाडाना अळीकरणे व पाणी देणे, गाजर गवत निर्मुलन अशी श्रमदानाची कामे केली आहेत.

रक्तदान शिबीर साक्षरता, पर्यावरण, एड्स जनजागृती, लेक वाचवा, इत्यादी विषयावर पोस्टर प्रेझेन्टेशन विविध विषयांच्या व्याख्याने उदा. ग्रामीण विकासाच्या विविध योजना स्त्री सबलीकरण, जागतीक महिला दिन इत्यादी. राष्ट्रीय एकात्मता या विषयावर गट चर्चा आधुनिक संवाद साधने फायदे तोटे गटचर्चा इत्यादी कार्यक्रम नियमितपणे घेण्यात आले. कृष्णाघाट साफसफाई, गणपती विसर्जन निर्माल गोळा करणे हा कार्यक्रम घेण्यात आला.

**इतर कार्यक्रम** :— व्याख्याने श्रमदानाच्या कामाबरोबरच वर्ष भरामध्ये एन.एस.एस. तर्फे इतरही कार्यक्रम राबवन्यात आले आहेत. पर्यावरण जनजागृत मोहिम, प्रचार फेरी, मतदार जागृती प्रचार फेरी, पेशावर येथे झालेल्या दहशत वादी हत्या कांडाचा निषेध व्यक्त करण्यासाठी रॅली अश्या कार्यक्रमामध्ये आमचे विद्यार्थी सहभागी झाले आहेत. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास घडवून आणण्यासाठी तसेच त्यांच्यातील नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी विविध व्याख्याने विविध चर्चासत्रे यांचे आयोजन करण्यात आले होते.

**विशेष श्रमसंस्कार शिबिरात विद्यार्थ्यांचा सहभाग** :— दिनांक १८/०१/२०१५ ते २५/०१/२०१५ या कालावधी मध्ये कणेरीमठ जि.कोल्हापूर याठिकाणी झालेल्या भारतीय संस्कृत उत्सवामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थी अभूतपूर्व उत्साहाने सहभागी झाले होते. या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गर्दी नियंत्रण, अन्न वाटप आरोग्य शिबीर रक्तदान शिबीर स्वच्छता मोहिम वृक्ष जोपासना इत्यादी उपक्रमात सक्रीय सहभाग घेतला.

**आभार** :— वर्षभरामध्ये राष्ट्रीय सेवा योजने उपक्रम व्यवस्थीतपणे राबवण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमर पांडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याचबरोबर महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग,कमिटी सदस्य, प्रशासकीय सेवक हरीपूर ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, कणेरीमठ येथील सर्व पदाधिकारी, तेथील ग्रमपंचायत सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामविकास अधिकारी तलाठी, ग्रामपंचायत सेवक वर्ग, विद्यार्थी या सर्वाचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याच प्रमाणे शिवाजी विद्यापीठातील एन.एस.एस. विभागातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी वर्ग यांचा सक्रीय सहभाग लाभले. त्याबद्दल सर्वाचे हार्दिक आभार.

प्रा.शिवप्रसाद शेटे
प्रोग्रॅम ऑफीसर

डॉ. अमर पांडे
प्राचार्य

ल.ए.सोसायटीचे

# नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, सांगली

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार अहवाल २०१४–१५

आमच्या महाविद्यालयाच्या रा.से.यो. वतीने चालू शैक्षणिक वर्षामध्ये रविवार दिनांक 18/01/2015 पासून 25/01/2015 या दिवसांमध्ये मु.पो.सिध्दगिरी मठ, कणेरी ता. कागल, जि. कोल्हापूर या ठिकाणी रा.से.योजना, कार्यक्रम शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनानुसार यशस्वीपणे पार पाडले.

सदर कालावधी मध्ये सिध्दगिरी मठ व भारत विकास संगम यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य असा भारतीय संस्कृती उत्सव पार पडला. महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी या विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये कणेरी गावाच्या विकासासोबतच भारतीय संस्कृती उत्सवामध्ये हिरीरीने भाग घेत, उत्सवाचे संयोजन यशस्वी करण्यासाठी मोलाचा हातभार लावला.

रविवार दि. 18/01/2015 रोजी शिबीराची सुरवात शोभायात्रेमध्ये झालेल्या स्वयंसेवकांच्या सहभागाने झाली. सिध्दगिरी मठाने आयेजित केलेल्या शोभायोत्रेमध्ये महाविद्यालयाच्या रासेयोच्या स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला. पदयात्रामध्ये अन्न वाटपाचा कार्यक्रम पार पडला.

सोमवार दि. 19/01/2015 रोजी भारतीय संस्कृती उत्सवाचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री नाम. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते पार पडले. त्याच दिवशी सायंकाळी मठाधिपती पू. कांडसिंध्देश्वर स्वामीजी यांच्या हस्ते शिबीराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम अधिकारी प्रा. शिवप्रसाद शेटे व महाविद्यालयातील इतर प्राध्यापक वर्षा उपस्थिती होता.

मंगळवार दि. 20/01/2015 रोजी विद्यार्थ्यांनी उत्फूर्तपणे क्रांती उत्सवास सहभागी झाले. शेतीविषयक विविध प्रयोगाची विहिती त्यांनी घेतली. लखपती शेती. खेत, गोरक्षण, इ. विषयावर प्रदर्शने माहींनी घेतली. प्रत्यक्ष कामामध्ये वृक्षारोपन, तणनाशक इ. कार्यक्रमामध्ये सहभाग घेतला. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

21/01/2015

बुधवारी संपन्न झालेला वारकरी उत्सव हा सुंदरच होता त्यामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रीयपणे गर्दी नियंत्रण, वाहतुक निमंत्रण इत्यादी कामामध्ये प्रशासकीय यंत्रणेस सहकार्य केले. पाणीपुरवठा संयोजनात मदत केली. त्याच बरोबर ग्रामीण स्वच्छता, आरोग्य इ. विषय प्रबोधनात्मक रॅली काढली.

22/01/2015

गुरूवार युवा ज्ञानोस्तोवामध्ये सहभाग नोंदवला स्वयंसेवकांनी पहाटे 4.30 वा. प.पू श्री. स्वामी रामदेव यांच्या शिबीरामध्ये योगासने प्राणायम यांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण यांचा लाभ घेतला. त्यानंतर वैज्ञानिक डॉ. विजय भास्कर यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला. वैज्ञानिक प्रदर्शनाचा लाभ घेवून विद्यार्थ्यांनी वृक्ष दिंडी काढली. सांयकाळी सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

23/01/2015

शुक्रवार पहाटे 4.30 ते 7 प.पू. स्वामी रामदेव यांच्या शिबीरामध्ये योगासने व प्राणायाम यांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण दिवसभर झालेल्या कार्यक्रमामध्ये विविध क्षेत्रामध्ये चमकदार कामगिरी केलेल्या महिलांच्या सत्काराचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. सायंकाळी रस्ता स्वच्छता मोहिम व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

24/01/2015

शनिवार उत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी उस्र्फूर्त सहभागी घेत रक्तदान शिबीर आयोजित केले. व त्यामध्ये सक्रीय सहभाग घेतला. सांयकाळी सिध्दगिरी मठाव्दारे जाणता राजा कार्यक्रमाचा लाभ घेतला.

25/1/2015

रविवार सकाळच्या सत्रामध्ये शिबीराचा आढावा घेवून दुपारच्या सत्रात सिध्दगिरी मठाचे उत्तराधिकारी प. पू भूपिन सिध्देश्वर स्वामी यांच्या उपस्थितीत शिबीराचा समारोप संपन्न झाला.

प्रा.शिवप्रसाद शेटे<br>प्रोग्रॅम ऑफीसर

डॉ. अमर पांडे<br>प्राचार्य